**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – २७/०३/२०२४

**दि. २६/०३/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी १९१/२०२४ भा.दं.वि कलम ३९५,४२७, आर्म ॲक्ट ४(२५) महा. पो. अधि. ३७(१) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३,७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०३/२०२४ रोजी १८/३० वा. चे सुमारास माझे राहते घरासमोर शितळा देवी मंदीर शेजारी, बोपखेल पुणे

गुन्हा दाखल :- दि.२६/०३/२०२४ रोजी १९.०६ वा

फिर्यादी :- अभिजित ओमप्रकाश अगरवाल, वय-३५ वर्षे, धंदा-किराणादुकान, रा. शितळा देवी मंदीर शेजारी, बोपखेल पुणे

आरोपी :- १)सोन्या तांबे, २)आकाश अर्जुन गिरीगोसावी वय-३० वर्ष रा पाटीलवाडा साई चौक बोपखेल पुणे
३)विक्की पिल्ले, ४)शुभम अहिरवार ५)अजय पिल्ले, ६)इतर पाच ते सहा रा. सर्व बोपखेल
**आरोपी क्र २ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे राहते घरासमोर शितळा देवी मंदीर शेजारी, बोपखेल पुणे येथे फिर्यादीची पार्ककेलेली अल्टोकार नंबर एमएच १४ सीएस ०१७७ हिचे जवळ फिर्यादी आले असता बोपखेल परीसरातील नमुद आरोपीहे सर्वजण हातात कोयते घेवुन फिर्यादी जवळ येवुन फिर्यादीला कोयत्याचा धाक दाखवुन'मी इथला भाई आहे तुला माहित नाही का?' अशी धमकी देवुन नमुद आरोपी यांनी फिर्यादीचे पॅन्टचेखिशातील ५६०/- रुपये रोख रक्कम, आधार कार्डची छायांकित प्रत जबरदस्तीने काढुन नेले आहे व फिर्यादीची अल्टोकार नंबर एमएच १४ सीएस ०१७७ हिचे मागील पुढील काचेवर तसेच डावे बाजुचे मागील दरवाजाचे काचेवर आरोपी यांचे जवळील कोयते, लाठया मारून अदांजे १०,०००/- रूपयेचे नुकसान करून सदर परीसरात दशहत निर्माण केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जोनापल्ले ७५८८९१०२५७

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ३८१/२०२४ भा.दं.वि कलम ४२०,४०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०३/०३/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. ते दुपारी ०२.४५ वा. दरम्यान आर-एच-१३, ड्रिम्स रिदम, बावधान बुद्रुक, ता.मुळशी जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.२६/०३/२०२४ रोजी १७.०९ वा

फिर्यादी :- पुरुष फिर्यादी

आरोपी :- १) फॅशन केप इकार्ट कस्टमर केअर नंबर (०८००२०८९८९८)
२) ०७३७१९४२४८५ वरील अनोळखी इसम
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीहे फेसबुक पाहत असताना फॅशन केप इकार्ट चष्माची ऑनलाईन जाहीरात पाहुन दोन ग्लास मागवले त्यापैकी एक डिफेक्ट ग्लास आल्याने तो तेव्हा आरोपी क्र १ ने फिर्यादीचा कॉल हा ०७३७१९४२४८५ (आरोपी क्र २) या नंबरवर जोडुन फिर्यादीला त्यांचे ग्लासचे पैसे परत करतो असा विश्वास संपादन करुन फिर्यादीला त्यांचे मोबाईल मध्ये anydesk प डाउनलोड करण्यास सांगुण फिर्यादीचे कॅनरा बँक खाते वरुन एकुण ४ लाख ५० हजार ५००/- रुपये रक्कम काढुन घेवुन फिर्यादीची फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि गिरी ८४४६७१४०३५

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ३८२/२०२४ भा.दं.वि कलम ४२०,४०६ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(सी) ६६(डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.११/०३/२०२४ रोजी १५:४० वा. ते दि.१३/०३/२० २४ रोजीचे २१:०० वा. चे सुमारास सनवे मेगा पोलीस, १०३, ए- १३, नियर टिसीएस हिंजवडी ता- मुळशी जि- पुणे

गुन्हा दाखल :- दि.२६/०३/२०२४ रोजी १९.०१ वा

फिर्यादी :- पुरुष फिर्यादी

आरोपी :- अज्ञात आरोपी

तपशिल :- दि.११/०३/२०२४ ते दि.१३/०३/२०२४ रोजी पावेतो दिनानाथ दिक्षित या नावाने त्याचा मो.नं. ६२०७८६९७५४ यावरून फिर्यादीस फोन करून, तो कोल इंडीया,(कोल माईन्स प्रेव्हिडंट फंड,धनबाद) मधील ऑफिसर बोलत आहे, असे खोटे सांगुन स्वतःची खरी ओळख लपवून, माझे पेन्शन अकाउंट ऑनलाईन करायचे आहे. हे कारण सांगुन फिर्यादीचे मोबाईलमध्ये असलेले व्हॉटसअँप हे त्याने त्याच्या मो.क्र. सोबत त्यांना विश्वासात घेवून शेअरींग करायला सांगितले, व त्याव्दारे फिर्यादीचे स्टेट बँक अकाउंट चे एस.बी.आय. योनो अँप मध्ये फिर्यादी यांना ऑप्शन क्लिक करायला सांगितले व त्यामधून फिर्यादीचे एकूण २४ लाख रू. व बँक ऑफ इंडीयाचे खात्यावरून १ लाख रू. व स्टेट बँक अकाउंट नं. ११२३६०१८३१७ मधून ३ लाख रू.अशी एकूण २८ लाख रूपयांची फसवणूक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि शेळके सो ९३७१४१९९९९

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ३६४/२०२४ भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०३/२०२४ रोजी २३/१५ वाचे सुमारास थेरगाव गावठाणाकडे जाणाऱ्या कपानीचे उजवे बाजूस, कमानीचे खांबा शेजारी, थेरगाव, पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२६/०३/२०२४ रोजी ०१.१२ वा

फिर्यादी :- वंदु दत्ताजय गिरे पोलीस हवालदार ब.नं.२९२४ नेमणुक - वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड

आरोपी :- १)माऊली ऊर्फ ज्ञानेश्वर सुबराव पवार, वय २३ वर्षे, रा. लिपर्स हॉटेलच्या मागे, पवारनगर, गल्ली नं. ०८, शेख यांचे खोलीत भाड्याने, थेरगाव, पुणे मुळ रा. वाटंमबरी, ता. सांगोला, जि. सोलापूर
२)अजय म्हस्के, रा. थेरगाव, पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने त्याचे कब्जात बेकायदा बिगर परवाना ५०,०००/- रु किं चे ०१ पिस्तुल व २,०००/- रु किं चे ०१ जिवंत काडतुस हे अग्निशस्त्र त्यावर केंद्र शासनाने ठरविल्या प्रमाणे बनविणाराचे नाव, निर्माणकाचा क्रमांक व अन्य ओळखचिन्हे नसलेले सदरचे पिस्तूल हे इसम नामे अजय म्हस्के, रा. थेरगाव, पुणे याचे असलेले आपले कब्जात बाळगले असताना मिळुन आला. तसेच मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग केला म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि चव्हाण ९५४५४८६०२८

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड १२५/२०२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२, ३७(१) सह १३५, भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०३/२०२४ रोजी २०/४५ वा. पांढरकर चाळ म्हसोबा मंदीराचे पाठीमागे,दळविनगर,चिंचवड पुणे.

गुन्हा दाखल :- दि.२६/०३/२०२४ रोजी ०१.४१ वा

फिर्यादी :- उमेश देवचंद वानखडे, पोलीस अंमलदार २१२३, नेमणुक - चिंचवड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे

आरोपी :- विकास ऊर्फ विक्या अंकुश भिसे, वय २७ वर्षे, रा. दळवी नगर झोपडपटटी चिंचवड, पुणे
**आरोपी अटक आहे**

| | | |
|---|---|---|
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यास मा. पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ - १ यांचे कडील तडिपार आदेश क्र ५९/२०२३ दि.०२/११/२०२३ अन्वये दोन वर्षाकरिता पुणे जिल्हा हद्दितुन तडीपार करण्यात आले आहे. तसेच आपल्या कब्जात अनाधिकाराने बेकायदेशिर रित्या विना परवाना ५००/- रु किं चा एक लोखंडी कोयता बाळगून मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिचंवड आयुक्तालय यांचे आदेशाचा भंग करुन विनापरवाना पांढरकर चाळ म्हसोबा मंदीराचे पाठीमागे दळवीनगर चिंचवड पूणे येथे मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोफौ सनदी ८३२९२००२७० |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी २५०/२०२४ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२, ३७(१) सह १३५ व भारतीय हत्यार कायदा ४, २५ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०३/२०२४ रोजी ००.२५ वा. चे सुमारास विद्यानगर, बस स्टॉपचे जवळ, चिंचवड, पुणे येथे सार्वजनिक ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/०३/२०२४ रोजी १३.४३ वा |
| फिर्यादी | :- | सचिन मधुकर भातखबर, वय २३ वर्षे, पोलीस शिपाई, बक्कल नं. ३६२६, नेमणुक पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड. |
| आरोपी | :- | आनंद नामदेव दनाने, वय ३१ वर्षे, रा. विद्यानगर, बस स्टॉप मागे, चिंचवड, पुणे.<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यास मा. पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १, पिंपरी चिंचवड यांचे कडील तडीपार आदेश क्रमांक ०७/२०२४, सुधारीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, कलम ५६(१)(ब) प्रमाणे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पुणे ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता दिनांक १२/०२/२०२४ रोजी पासून हद्दपार करण्यात आले असताना, तो सदर आदेशाचा भंग करून, तसेच आपले कब्जात २००/- रू.किं.चा एक लोखंडी कोयता बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना पाटील ९३७०९६३१२९ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ११८/२०२४ भा.दं.वि कलम ४०६,४२०, ४६७,४६८, ४७१,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०१/२०१५ रोजी०३.११ ते २६/०३/२०२४ रोजी पर्यतबिजल अपार्टमेंट, फ्लॅट क्र १, पिंपळे गुरव, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२७/०३/२०२४ रोजी ००.२८ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)श्री राजेंद्र दयाप्रसाद गायकवाड रा पुष्पांजली हौसिंग सोसायटी सदगुरु जंगलीमहाराजनगर फलॅट नं ५०३ पिंपळे गुरव पुणे<br>२)सुलक्षण राजेंद्र गायकवाड रा सदर<br>३)श्री लक्ष्मण बळीराम जाधव रा तुकाराम धनावडे अनंतनगर भगतसिंग चौक पिंपळे गुरव पुणे<br>४)श्री सदाशिव अच्युत राव परभणे रा माने बिल्डींग कृष्णा कॉलनी कोकणेनगर काळेवाडी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादी व अरोपी क्रमांक १ याच्या संयुक्त नावावर असलेला बिजल अपार्टमेंट, फ्लॅट क्र १, पिंपळे गुरव, पुणे हा फ्लॅट ची बनावट सहयांच्या अधारे कागदपत्रे बनवुन सदरचा फ्लॅट ची रु २२.५० लाख रु विक्री करुन फिर्यादी यांची रु २२.५० लाख ची फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पाटील ९१३७२७३४५० |

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी २४९/२०२४ भा.दं.वि कलम ४५२,३२४, ३२३,५०४, ३४ आर्म ॲक्ट ४,२५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २५/०३/२०२४ रोजी दुपारी ०४/०० वा.चे सेनेटरी चाळ पत्रा शेड पिंपरी पुणे.

गुन्हा दाखल :- दि.२६/०३/२०२४ रोजी ११.४१ वा

फिर्यादी :- प्रेम सचिन मोरे वय १८ वर्षे धंदा नोकरी रा.सेनेटरी चाळ पत्रा शेड पिंपरी

आरोपी :- १)नॉडी गायकवाड,रा.आबेडकर कॉलनी पिंपरी पुणे पुर्ण नाव पत्ता माहित नाही २)कार्तिक शेट्टी,रा.मिनिंद नगर पुर्ण नाव पत्ता माहित नाही ३)ओम सांवत पुर्ण नाव पत्ता माहित नाही
४)अजित निकम रा.आबेडकर कॉलनी पुर्ण नाव पत्ता माहित नाही
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी त्याच्या घराच्या खाली थांबलो होतो.त्यावेळी त्याच्या ओळखिचे नमुद आरोपी असे चारजण रंग लावण्यासाठी फिर्यादीकडे आले तेव्हा त्याना फिर्यादी म्हणाले की माझ्या घरी पाहुने आले आहेत त्यामुळे आपण रंग नंतर खेळु असे म्हणताच त्यानी रंग लावण्यास सुरवात केली त्यावरुन फिर्यादी व त्याची बाचाबाची झाली व ते निघुन गेले. त्यानंतर फिर्यादी घरी जेवणाचा कार्यक्रम असल्याने दुपारी ०४/०० वा.चे सुमारास फिर्यादी हे भांजी मंडई मध्ये लसुन आण्यासाठी गेलो असताना नमुद आरोपी हे समोरुन येताना दिसली त्यावेळी त्याना पाहुन फिर्यादी घराकडे पळुत गेले घराचा दरवाचा बंद करुन घरात बसले त्यावेळी नमुद आरोपी हे फिर्यादीच्या पाठिमागु येवुन फिर्यादीच्या घरच्या दरवाच्यावर लाथा मारुन फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ करुन घरात येवुन फिर्यादीस आरोपी क्र १ व ३ यांनी त्याच्या हातातील लोखंडी कोयत्याने फिर्यादीच्या दोन्ही हाताला,दोन्ही पायाल मारुन जखमी केले तसेच आरोपी क्र २ व ४ यांनी फिर्यादीस लाथा बुक्काने मारुन शिवीगाळ करुन ते तेथुन पळुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ देखमुख ७७७५८७६६२१

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी १५३/२०२४ भादवि कलम ४०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०३/२०२४ रोजी २३/५५ वा. सुमा. गोडावुन चौक, पुणे-नाशिक रोड, भोसरी, पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२६/०३/२०२४ रोजी २०/०२ वा.

फिर्यादी :- पंकज सुधाकरधोडरे, वय ३१ वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी,रा. फ्लॅटनंबर १००६, वैष्णवी ओरेनस सोसायटी, जाधववाडी, चिखली. पुणे.

आरोपी :- एक अनोळखी इसम

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे दारुच्या नशेमध्ये गोडावुन चौक येथे असताना त्यांनी पत्ता विचारलेल्या अनोळखी इसमाने त्यांना तुम्ही खूप दारु पिलेले आहात, मी तुम्हाला तुमच्या घरी सोडतो असे म्हणुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांना घरी सोडण्याच्या बहाण्याने गाडीवर निर्मनुष्य ठिकाणी नेवुन त्यांची ६०,०००/- रुपये किंमतीची होंडा कंपनीची ॲक्टिवह ५ जी दुचाकी क्र एमएच ३४ सीई १६०२ व २०,०००/- रुपये किंमतीचा विवो कंपनीचा व्ही २७ मॉडेलचा मोबाईल असे एकुण ८०,०००/- किं चा माल घेवुन जावुन तिचा अपहार केला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि आहिरे ९६८९९४६७८४

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी २५२/२०२४ भा.दं.वि कलम २८५,२८६ सह जिवनावश्यक वस्तुचा कायदा १९५५ चेकलम ३,७ सह स्फोटक पदार्थ अधिनियम सन १९०८ चे कलम ५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०३/२०२४ रोजी १२.३५ वा. चे सुमारास दातीर पाटिलकॉलनी एम.आय.डी.सी. रामनगरचिंचवड येथिल संदिप दातीर पाटिल यांच्या मालकीच्यादुकानामध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/०३/२०२४ रोजी २०.४५ वा |
| फिर्यादी | :- | सागर दशरथ अवसरे पो.ना. ब.नं. २८०९ गुन्हे शाखा युनिट ०२, पिंपरी-चिंचवड. |
| आरोपी | :- | प्रदिप तुकाराम मगर वय ४० वर्षे धंदा- व्यवसाय रा. सी/ओ नवनाथ इंचुरे कांताई निवास, सप्तश्रृंगी मेडीकलच्या पाठीमागे, तापकीर चौक, काळेवाडी<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने घरगुती वापराचे भरलेल्या गॅससिलेंडर मधुन रिफीलिंग सर्कीटच्या सहाय्याने घरगुती वापराचा गॅस अवैधरित्या कोणतीही खबरदारी नघेता लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल हे माहित असुन सुध्दा मानवी जिवीतास पोहचणा-या कोणत्याही संभाव्य धोक्या पासुन सुरक्षित राहण्यास पुरेसाइतका बंदोबस्त करणे गरजेचे असताना, ज्वालाग्राही पदार्थाबाबत पुरेसाइतका बंदोबस्त करण्याचे जाणीवपुर्वक टाळुन, त्यांचे ताब्यातील घरगुती भरलेल्या सिलेंडर मधुन इतर छोटया सिलेंडर मध्येगॅस काढुन घेत असताना १६,८००/- रु किंमतीच्या मुदद्‌ेमालासह मिळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि बोकेफोडे ९४०३७१५३२२ |